# जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण
## जिल्हाधिकारी कार्यालय,पुणे

टोल फ्री क्रमांक :१०७७ दुरध्वनी क्रमांक :०२०-२६१२३३७१, Email id - collector.pune@maharashtra.gov.in

जि.का./क्रं.आ.व्य./कावि/ ९८९८ /२०२० दिनांक :- २५ जुन, २०२०

वाचले : -

१. भारतीय साथरोग अधिनियम १८९७
२. भारत सरकार गृहमंत्रालय दिल्ली यांचेकडील पत्र क्रं.१३७/२०१.एफटीएस१०५४८ दि.१०.०२.२०२०
३. महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचेकडील क्र.करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य -५, दि.१३/०३/२०२०, दि.१४/३/२०२० तसेच दि.१५/३/२०२० रोजीच्या अधिसुचना
४. मा.मुख्य सचिव महाराष्ट्र राज्य यांचेकडील महसुल व वनविभाग, आपत्ती व्यवस्थापन,मदत व पुनर्वसन अधिसुचना क्रमांक.डीएमयु/२०२०/सीआर.९२/डीआयएसएम-१ दि.१७.०५.२०२०
५. महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना No.DMU/२०२० CR.९२/DisM-१, दि.१९ मे २०२०
६. मा.गृह मंत्रालय,भारत सरकार यांचेकडील आदेश क्र.४०-३/२०२० डीएम-I(A) दि.३०/०५/२०२०
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, महसूल व वन,आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन यांचेकडील अधिसूचना क्र.DMU/2020.CR.92/DisM-1, दिनांक ३१ मे, २०२०
८. या कार्यालयाकडील आदेश क्रं.जि.का./क्रं.आ.व्य./कावि/१३६३/२०२० दि.३१ मे २०२०
९. मा.विभागीय आयुक्त यांचेकडील अर्धशासकीय पत्र क्रं.अ.शा.पत्र.क्रं.साप्र/०३/कावि/६०४/२०२० दि.२२.०६.२०२०

जिल्हाधिकारी पुणे

**विषय :- कोरोना विषाणू संसर्ग रोखण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी चेह-यावर मास्क परिधान न करणा-या तसेच सार्वजनिक ठिकाणी थुंकणा-या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करणेबाबत.**

## आदेश

राज्य शासनाने कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दिनांक १३ मार्च २०२० पासुन लागु करुन करुन खंड २,३,४ मधील तरतुदीची अंमलबजावणीसाठी अधिसूचना निर्गमित केलेली आहे. त्याबाबतची नियमावली संदर्भिय ३ अन्वये प्रसिध्द केली आहे आणि जिल्हाधिकारी यांना सक्षम प्राधिकारी घोषित केलेले आहे.

ज्याअर्थी, कोविड १९ विषाणूच्या संसर्गाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत असल्याने आपत्कालीन उपाय योजनेचा भाग म्हणून मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन यांनी संपूर्ण महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रात लॉकडाऊन (Lockdown) ची घोषणा यापूर्वी केलेली असून त्यास संदर्भीय ७ अन्वये ३० जून २०२० पर्यंत मुदतवाढ आणि टप्पे निहाय लॉकडाऊन समाप्त करणे आणि निर्बंध कमी करण्यासाठी **"मिशन बिगीन अगेन" (MISSION BEGIN AGAIN)** बाबत अधिसूचना जाहीर केलेली आहे..

ज्याअर्थी, वाचले क्रं.७ अन्वये कोरोना विषाणुचा राज्यातील वाढता प्रादर्भाव लक्षात घेता अधिसुचनेतील दिलेले निर्देश व ॲनेक्चर १ मध्ये दिलेल्या सुचनेप्रमाणे सर्व **सार्वजनिक ठिकाणी तसेच कामाचे ठिकाणी व प्रवासात असताना चेह-यावर मास्क परिधान करणे बंधनकारक केलेले आहे तसेच सार्वजनिक स्वच्छता राखणेचे निर्देश दिलेले आहेत.त्यानुसार सार्वजनिक ठिकाणी पान तंबाखु, गुटखा खाऊन थुंकने किंवा त्याशिवाय न थुंकणेबाबत दिलेल्या निर्देशांचे पालन करणे बंधनकारक आहे.सदर निर्देशांचे पालन न करणा-या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करणेचे आदेश पारीत करणे उचित होईल असे मत झाले आहे.**

**त्याअर्थी, मी नवल किशोर राम ,जिल्हाधिकारी पुणे, संदर्भीय ७ व ८ अन्वये शासन अधिसूचना सुधारणा पुणे जिल्हा कार्यक्षेत्रात लागू केली आहे. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका /नगरपरिषद /नगरपंचायत / ग्रामपंचायत तसेच छावणी परिषद हददीमध्ये महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसूचनेतील निर्देशानुसार खालील प्रमाणे आदेश पारीत करित आहे. सर्व संबंधित प्रशासकिय विभाग यांनी सदर आदेशाची अंमलबजावणी करावी**

Scanned by CamScanner

१. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/ग्रामपंचायत तसेच छावणी परिषद हददीतील जे नागरिक मास्कचा वापर न करता सार्वजनिक ठिकाणी फिरत असताना, थांबलेले असताना व गाडी चालवत असताना आढळुन आलेतर अशा व्यक्तींना र.रु.५००/- इतका दंड आकारणेत यावा.
२. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रातील नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/ग्रामपंचायत तसेच छावणी परिषद हददीतील जे नागरिक सार्वजनिक ठिकाणी पान,तंबाखु,गुटखा खाऊन थुंकल्यास किंवा त्या शिवायही थुंकल्यास अशा व्यक्तींना र.रु.५००/- इतका दंड आकारणेत यावा.
३. पुणे जिल्हा ग्रामीण कार्यक्षेत्रात वरील प्रमाणे निश्चित करणेत आलेल्या दंडाची वसुली ग्रामस्तरावरील ग्रामसेवक/ग्रामपंचायत कर्मचारी यांनी करावी.
४. तसेच नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत/छावणी परिषद क्षेत्रामध्ये संबधित मुख्याधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फतीने वरील प्रमाणे निश्चित करणेत आलेल्या दंडाची वसुली करावी.
५. संबंधित भौगोलिक क्षेत्रात दंडाची वसुल केलेली रक्कम ती त्या संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थेत जमा करणे बंधनकारक राहील.

सदर आदेशाचा भंग करणा-या कोणत्याही व्यक्ती, संस्था आणि संघटना विरूध्द भारतीय साथरोग अधिनियम १८९७, भारतीय दंड संहिता (४५ ऑफ १८६०) कलम १८८ आणि या संदर्भातील शासनाचे प्रचलित इतर अधिनियम व नियम अन्वये योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

सदरचा आदेश आज दिनांक २५/०६/२०२० रोजी माझे सही व शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हाधिकारी पुणे

(नवल किशोर राम)
जिल्हाधिकारी, पुणे

प्रति-

१. मा. आयुक्त पुणे व पिंपरी चिचवड महानगरपालिका
२. मा. पोलीस आयुक्त, पुणे शहर व पिंपरी चिंचवड
३. मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद पुणे
४. पोलीस अधिक्षक पुणे ग्रामीण
५. सर्व विभाग प्रमुख ------------------जिल्हा पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.
६. उपविभागीय दंडाधिकारी सर्व ---------------------- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
७. तहसिलदार सर्व -----------------------------यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
८. गटविकास अधिकारी सर्व -------------------- यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
९. सह.आयुक्त अन्न व औषध प्रशासन, पुणे
१०. कामगार उपायुक्त पुणे
११. सचिव कृषि उत्पन्न बाजार समिती, पुणे
१२. जिल्हा शल्यचिकित्सक, औंध पुणे / सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी पुणे
१३. जिल्हा उपनिबंधक सहकार पुणेशहर/ग्रामीण
१४. मुख्याधिकारी नगरपरिषद/ नगरपालिका/नगरपंचायत ------------------ यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी
१५. जिल्हा माहिती अधिकारी पुणे यांना आवश्यक त्या कार्यवाहीसाठी.

प्रत- १) मा. विभागीय आयुक्त , विभागीय आयुक्त कार्यालय, पुणे विभाग पुणे माहितीसाठी सविनय सादर
२) मा. सचिव आपत्ती व्यवस्थापन मदत व पुनर्वसन विभाग, मंत्रालय मुंबई -३२ यांचेकडे माहितीस्तव सविनय सादर

Scanned by CamScanner